# सुरक्षा महत्त्वाची !

लग्न ठरवण्याची प्रक्रिया इंटरनेटवर सुरु होऊन आता वीस एक वर्ष झाली. अनुरूपच्याही वेबसाईटला सतरा वर्ष झाली. दरवर्षी वेबसाईटमार्फत जोडीदार निवडणाऱ्यांची संख्या वाढतेच आहे. वेबसाईटवर प्रोफाईल बघून, फोन किंवा स्काईपकॉल करून पुढे जाणाऱ्या मंडळींची संख्या काही कमी नाही. पण या सगळ्या बदलत्या परिस्थितीमध्ये पालक आणि मुला-मुलींमध्ये एक प्रकारचं असुरक्षिततेचं वातावरण तयार झालंय. अनुरूपवरील प्रोफाईल्स विश्वासार्ह असतातच परंतु आजुबाजूच्या जगात घडणाऱ्या घटना बघून मनात थोडी चिंता दाटून येणं साहजिक आहे. त्या चिंतेला दूर करण्यासाठी अनुरूपतर्फे अतिशय तज्ज्ञ मंडळींची टीम कार्यरत आहेच. पण त्याचबरोबर तुम्हीही स्वतःला, स्वतःच्या प्रोफाईलला सुरक्षित करण्यासाठी काय करावे हे सांगणाऱ्या टिप्स या महिन्यात मी तुम्हाला देणार आहे-

१. **प्रोफाईल पासवर्ड-** सगळ्यात पहिला मुद्दा जो कोणत्याही ऑनलाईन व्यवहारांना लागू होतो तोच. कोणत्याही कारणास्तव आपल्या प्रोफाईलचा लॉग इन आय डी आणि पासवर्ड दुसऱ्या व्यक्तीकडे देऊ नये. आपले प्रोफाईल हेच वेबसाईटवर बघितले जाते त्यामुळे त्याची सुरक्षा पासवर्डच्या माध्यमातून तुमच्याच हातात आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या बँकेचे किंवा क्रेडिट कार्डचे तपशील कोणालाही देत नाही त्याचप्रमाणे अनुरूप प्रोफाईलचा पासवर्डही जपावा.

२. **इंटरेस्ट रिक्वेस्ट फिचर-** अनुरूपच्या वेबसाईट वर असणारे 'सेंड इंटरेस्ट रिक्वेस्ट' ही सोय वापरा. पहिला संवाद त्यातून होणे केव्हाही श्रेयस्कर. त्यावर येणाऱ्या प्रतिसादातून समोरच्या व्यक्तीचा अंदाज येतो. (साधे रिक्वेस्टला प्रतिसाद देण्याचेही सौजन्य नसणाऱ्या मंडळींवर फुली मारणे श्रेयस्कर!)

३. **मोबाईल/ऑनलाईन चॅटिंग-** कधीकधी असं दिसून येतं की पहिली भेट झाल्यावर किंवा कधीकधी तर पहिली भेट होण्याआधीच ऑनलाईन चॅटिंग सुरु होतं. भेट घ्यायची म्हणल्यावर साहजिकच मुलगा मुलगी एकमेकांचे नंबर घेतात आणि मग सुरुवात होते व्हॉट्सअॅपवर गप्पा मारायला. यातून घडतं असं की लग्नाच्या दिशेने गाडी जाईल न जाईल पण मुलगा किंवा मुलगी किंवा दोघेही एकमेकांमध्ये गुंतायला लागतात. प्रत्यक्षात पुढे लग्न न करण्याचा निर्णय घेतल्यावर एकाला किंवा दोघांनाही मानसिक धक्का बसतो, कधीकधी नैराश्यही येतं. शक्यतो या प्रक्रियेत व्हॉट्सअॅप गप्पा टाळलेल्याच बऱ्या.

**४. डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन-** अनुरूपच्या वेबसाईटवर आता चार प्रकारची कागदपत्र अपलोड करता येतात. आयडी प्रूफ, पत्त्याचा पुरावा, शिक्षणाचा आणि उत्पन्नाचा पुरावा. घटस्फोटीत अथवा विधवा-विधुर यांच्या बाबतीत घटस्फोटाची कोर्ट डिक्री किंवा आधीच्या जोडीदाराच्या मृत्यूचा दाखला हेही अपलोड करता येते. जी कागदपत्र समोरच्या व्यक्तीने आपल्या प्रोफाईलवर अपलोड केली असतील त्या समोर त्या प्रोफाईलवर 'बरोबर' ची खूण दिसते. इंटरेस्ट पाठवताना किंवा प्रत्यक्ष भेट ठरवण्याआधी सर्व कागदपत्रे अनुरूप वेबसाईटवर अपलोड करून व्हेरीफाय करायला सांगावे. प्रोफाईलची विश्वासार्हता वाढवण्यासाठी आवश्यक अशी ही काळजी नक्की घ्या. अर्थातच, दुसऱ्याला कागदपत्रे अपलोड करायचा आग्रह करताना तुम्ही स्वतःदेखील ती अपलोड करणे ओघानेच आले.

५. **भेटीची जागा,वेळ-** आजकाल पहिली भेट अनेकदा घरात न होता, मुलगा आणि मुलगी दोघंच बाहेर कुठेतरी भेटतात. हे करताना भेटीची जागा ही शक्यतो कॅफे, मॉल, हॉटेल अशी गजबज असणारी आणि सार्वजनिक असावी. शिवाय आडवेळेला ही भेट ठरवू नये. स्वतःच भेटीच्या जागी जाण्या-येण्याची सोय करावी. समोरच्या व्यक्तीवर अवलंबून राहू नये. ही भेट घेण्याआधी आपले पालक, जवळचे मित्र मैत्रिणी यांना कल्पना द्या. लग्न हे केवळ दोन व्यक्तींचं नसतं तर ते दोन कुटुंबांचं असतं.

या अगदी मोजक्या अशा काही टिप्स तुमची स्थळयात्रा अधिक सुरक्षित आणि अधिक आनंददायी होण्यासाठी. यांचे तंतोतंत पालन केल्यास तुम्ही अनुरूप जोडीदार शोधण्याच्या प्रक्रियेत चिंतामुक्त राहू शकाल हे निश्चित!